

लहान मुलांचे स्वागत करताना शिक्षक वृंद.

# बुट्टे पाटील इंग्लिश स्कूलमध्ये नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत

**जुन्नर :** जुन्नर मधील शंकरराव बुट्टे पाटील इंग्लिश मीडियम स्कूल मध्ये शाळेच्या पहिल्या दिवशी शालेय विद्यार्थ्यांचे मोठ्या उत्साहात शिक्षकांनी स्वागत केले. शाळेचा पहिला दिवस अतिशय उत्साहात, विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. यानिमित्त शाळेच्या सर्व वर्गात फुग्यांची सजावट करण्यात आली होती. लहान मुलांच्या स्वागताकरिता कार्टूनचे ड्रेस घातले होते. सर्व विद्यार्थ्यांना खाऊ वाटप तसेच शिक्षकांनी हाताने बनवलेले रंगीबेरंगी प्राण्यांचे मास्क चे वाटप करण्यात आले. कृतिशील शिक्षणावर आधारित अशा विविध उपक्रमांची अंमलबजावणी शिक्षकां तर्फे करण्यात आली. तसेच सर्वधर्मसमभाव हा गुण विद्यार्थ्यांमध्ये पुरविण्याकरिता रमजान ईदनिमित्त मुस्लिम बांधवांना शुभेच्छा पत्र देण्यात आले. इंग्लिश मिडीयम च्या मुख्याध्यापिका गायत्री काजळे व प्री-प्रायमरी विभाग प्रमुख उषा जनानी यांनी या कार्यक्रमाचे नियोजन केलेले होते. यावेळी संस्थेच्या संचालकांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.